शनिवार, २० डिसेंबर २०१४ www.prahaar.in
प्रहार



# वीकेंड यादगार करणारा ‘डेल्ला’!

तुम्हाला तुमचा वीकेंड यादगार करायचा असेल तर डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टला जाण्यास हरकत नाही. तिथे असलेल्या सुविधा आणि ॲडव्हेंचर गेम्स पाहता या ठिकाणी राहणं म्हणजे एक यादगार अनुभव ठरू शकेल. ४३ एकर्सवर पसरलेल्या जागेवर पंचतारांकित रेसॉर्ट्स, आलिशान व्हिला आणि बँक्वेटिंगचे अनेक पर्याय आहेत. डेल्ला लक्झरी रेसॉर्ट, कॅम्प डेल्ला रेसॉर्ट आणि डेल्ला ॲडव्हेंचर रेसॉर्ट अशा तीन वर्गवाऱ्यांतर्गत १२५ आलिशान खोल्या आहेत. या खोल्या ट्विन बेड्स, ऐसपैस आणि सुसज्ज बाथरूम, इन बाथरूम्स टीव्ही आणि वाक-इन क्लॉझेट्सनी सज्ज असतात... हे झालं अंतर्गत रचनेविषयी. मात्र या ठिकाणी अनुभवण्याजोग्या अनेक गोष्टी आहेत. इथे तुम्हाला शंभरहून अधिक ॲडव्हेंचर उपक्रम अनुभवायला मिळणार आहेत. त्यात एटीव्ही, फ्लाइंग फॉक्स, डर्ट बाइक्स, स्वूप, ॲक्वा झोंबिंग, लँड झोंबिंग, रोलर झोर्ब, जंगल कॅम्प, रॉकेट इजेक्टर, पेंटबॉल, रेडिओ कंट्रोल्ड कार्स, रेडिओ कंट्रोल्ड प्लेन्स आणि हेलिकॉप्टर्स तसंच हार्ड बॉल क्रिकेटचाही समावेश आहे. इथला जंगल कॅम्पचा अनुभव अतिशय लोकप्रिय आहे. इतकंच नाही तर त्यात ७०हून अधिक साहसी उपक्रमांमध्ये न्यूझीलंडमधील प्रशिक्षित इन्स्ट्रक्टर्सच्या मार्गदर्शनाखाली केले जाणारे बंजी जंपिंग, स्वूप स्विंग, मोटोक्रॉस, एटीव्ही राइड्स, सर्वांत जास्त लांबीचे फ्लाइंग फॉक्स, ॲक्का झोंबिंग, बग्गी राइड यांचा समावेश आहे. या रेसॉर्टमध्ये तुम्हाला आणखीही काही गोष्टींचा अनुभव घेता येणार आहे. त्यात संध्याकाळी ४ ते ५ या वेळेत कॉकटेल्स आणि मॉकटेल्स मिळणार आहेत. तसंच संध्याकाळी ७ ते रात्री ८ पर्यंत पंधराहून अधिक लोकांकरिता ट्रेझर हंट, बॉडी आर्ट याचा अनुभव घेता येईल. संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत योगा सत्रे होतील. इतकंच नाही तर ज्यांना पाककलेची आवड आहे त्यांच्यासाठी सकाळी ११ ते दुपारी १२ आणि संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत पाकक्रियेची सत्रंही होणार आहेत. याशिवाय सलोन, स्पा आहेच. इथे रेग्युलर, एकस्ट्रीम, प्रीमियम, जंबो, टर्बो, हॉबी पॅकेजेस किड्स ॲडव्हेंचर आणि फॅमिली पॅकेजेस उपलब्ध आहेत. तेव्हा या पॅकेजेसचा वापर करून डेल्ला ॲडव्हेंचरचा आपापल्या पद्धतीने आणि आवडीनुसार अनुभव घ्या. या ठिकाणी सुट्टी घालवण्याचा अनुभव अविस्मरणीय असेलच. त्यासाठी फार लांब जाण्याची गरज नाही. मुंबई-पुणे मार्गावरील प्रसिद्ध लोणावळ्यात डेल्लाचं मोठं प्रोजेक्ट आहे, आणि याविषयीची अधिक माहिती हवी असल्यास www.dellaadventure.com या संकेतस्थळावर ती उपलब्ध आहे.

